महाराष्ट्र शासन

**वस्तू व सेवाकर विभाग**

**विशेष राज्यकर आयुक्तांचे कार्यालय, माझगाव, मुंबई**

दूरध्वनी क्रमांक -०२२ २३७६०३१०/०८७३/०३१२

ई-मेल आयडी -acest005@gmail.com ,


---

क्रमांक:- सराआ/ आस्था-५/ गैरहजर उमेदवार/ ब- 237 मुंबई दिनांक : 21/04/2025

प्रति,

कागदपत्र पडताळणीस गैरहजर उमेदवार,
कर सहायक २०२३

**विषय:- कर सहायक २०२३ कागदपत्र पडताळणीस गैरहजर उमेदवारांना कागदपत्र पडताळणीची संधी उपलब्ध करुन देणेबाबत**

संदर्भ:- १) आयोगाचे पत्र क्र.१४४२/गट-क संयुक्त क.स./२०२३/चोवीस दि. ११.०३.२०२५
२) शासनाचे पत्र क्र. विकवि ११२२/प्र.क्र.१३९/वि.प्र.-१ दि.१८.०३.२०२५

संदर्भाधिन विषयानुसार सविनय सादर करण्यात येते की, कर सहायक गट क या संवर्गाच्या सन २०२३ या वर्षाकरीता ४६५ पदांचे मागणीपत्र शासनास सादर करण्यात आले होते. सदर परीक्षेचा निकाल महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दि.०५.०३.२०२५ रोजी विज्ञापीत केलेले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने कर सहायक २०२३ परीक्षेतील ४६५ पात्र उमेदवारांची शिफारस शासनास केलेली आहे. त्यानुषंगाने संदर्भ क्र. २ च्या पत्राद्वारे दि.०७.०४.२०२५ ते दि.०९.०४.२०२५ व ११.०४.२०२५ रोजी कर सहायक उमेदवारांची कागदपत्र पडताळणी आयोजित करण्यात आली होती. पत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ट क मधील एकुण ७१ गैरहजर उमेदवार कागदपत्र पडताळणीस हजर झालेले नाहीत. तरी सदर ७१ उमेदवारांना कागदपत्र पडताळणीसाठी दि. २४.०४.२०२५ रोजी सकाळी १०.०० ते संध्याकाळी ५.३० या वेळेत द्वितीय संधी देण्यात येत आहे.

परिशिष्ट क मधील उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीसाठी पुढील पत्त्यावर उपस्थित रहावे.

**वस्तू व सेवाकर विभाग,**
**स.रा.आ. आस्थापना-०५, ३ रा मजला, H विंग, नविन इमारत, वस्तु व सेवाकर भवन,**
**महाराणा प्रताप चौक, माझगांव सर्कल, माझगांव, मुंबई ४०० ०१०.**
**सर्वात जवळचे रेल्वे स्टेशन:- हार्बर लाईनवरील डॉकयार्ड रेल्वे स्टेशन**
**व सेंट्रल लाईनवरील भायखळा रेल्वे स्टेशन**

महेश कुलकर्णी
राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय-४)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सोबत - परिशिष्ट अ, ब आणि क

## परिशिष्ट - अ

१) प्रस्तूत पदासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविले आहेत. त्यामुळे उमेदवारांनी प्रमाणपत्रे आयोगाकडे सादर केलेली नाहीत. तसेच, कर सहाय्यक गट क ही एकाच टप्प्याची परीक्षा असून मुलाखत नसल्याने उमेदवारांच्या अर्हतेसंबंधित प्रमाणपत्रांची पडताळणी आयोगाकडून करण्यात आलेली नाही. आयोगाने प्रस्तूत केलेला निकाल उमेदवारांच्या अर्जातील दाव्यानुसार त्यांची पात्रता विचारात घेऊन जाहीर केला आहे. यास्तव प्रस्तूत परीक्षेतील शिफारसपात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यापूर्वी सबंधित सर्व मूळ प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात येईल.

२) प्रस्तुत परीक्षेतून शिफारसपात्र ठरलेले सर्व उमेदवार विहित वयोमर्यादा, आवश्यक विहित शैक्षणिक अर्हता, जातीविषयक दावे / NCL प्रमाणपत्र, क्रिडाविषयक प्रमाणपत्र, अपंगत्वाचे प्रमाणपत्र इ. विहित तारखेस धारण करीत असल्याचे नियुक्तीपूर्वी सक्षम प्राधिकाऱ्यांकडून काटेकोरपणे तपासणी करुन त्यांना नियुक्ती देण्यात येईल.

३) वयोमर्यादा दि. ०१.०५.२०२३ रोजी -

अ) अमागास उमेदवारांकरीता- किमान १८ वर्ष असावे व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.
ब) मागासवर्गीय उमेदवारांकरीता- किमान १८ वर्ष असावे व ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे.
क) अमागास व मागासवर्गीय खेळाडू उमेदवारांकरीता-किमान १८ वर्ष असावे व ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे.
ड) अमागास माजी सैनिक उमेदवारांकरीता- कमाल वयोमर्यादा ३८वर्षे+सेवेचा कालावधी + ३ वर्षे.
इ) मागासवर्गीय माजी सैनिक उमेदवारांकरीता- कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे+सेवेचा कालावधी + ३ वर्षे.
ई) दिव्यांग उमेदवारांकरीता - कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष

४) शैक्षणिक अर्हता- सांविधिक विद्यापिठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने मान्य केलेली समतुल्य अर्हता अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकास म्हणजे दि.३१.१०.२०२३ किंवा तत्पूर्वी धारण करणे आवश्यक आहे. मराठी टंकलेखनाचा वेग ३० शब्द प्रति मिनिट आणि इंग्रजी टंकलेखनाचा वेग ४० शब्द प्रति मिनिट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य परीक्षा मंडळाचे प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकास म्हणजे दि. ३१.१०.२०२३ किंवा तत्पूर्वी धारण करणे आवश्यक आहे.

शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र. एसपीई १०१२/(१०८/१२)/साशि-१, दि. ३१.१०.२०१३ नुसार अथवा तद्नंतर शासनाने वेळोवेळी आदेश काढून विहित केलेली संगणक टंकलेखन अर्हता-बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग मराठी ३० शब्द प्रति मिनिट अथवा बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग इंग्रजी ४० शब्द प्रति मिनिट (लागू असेल त्याप्रमाणे) समकक्ष अर्हता म्हणून स्वीकारार्ह आहे.

५) प्रस्तुत परीक्षेतून शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांच्या नियुक्तीपूर्वी त्यांच्या प्रमाणपत्र पडताळणीबाबत आयोगाच्या सूचना पुढीलप्रमाणे आहेत :-

**I. मागासवर्गीय उमेदवारांबाबत सूचना**

अनुसुचित जमातीच्या उमेदवारांचे दावे आयुक्त, आदिवासी विकास व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याकडून तपासून घेण्यात यावेत. तसेच अन्य सर्व मागासवर्गीय उमेदवारांचे जाती/ जमातीचे दावे नियुक्तीपूर्वी संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे यांचेकडून तपासून घेण्यात यावेत.

**II. उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेल्या उमेदवारांबाबत सूचना**

विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास वर्ग या वर्गावरील शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची जाहिरातीतील परिच्छेद क्र.५.११ मध्ये (अद्यायावत नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र/आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा म्हणून सक्षम प्राधिकाऱ्याने वितरित केलेले व अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. **दि.०१.०४.२०२२ ते ३१.०३.२०२३** या कालावधीतील) (पूर्व परीक्षा) नमुद केलेल्या कालावधीतील सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेली उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतची विहित नमुन्यातील प्रमाणपत्रे नियुक्तीपूर्वी संबंधित प्राधिकाऱ्यांकडून तपासून घेऊन त्यांच्या नियुक्तीबाबत निर्णय घ्यावा.

**III. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील उमेदवारांबाबत सूचना**

आर्थिकदृष्टया दुर्बल घटक या प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेले विहित नमुन्यातील व विहित कालावधीतील (दि.०१.०४.२०२२ ते ३१.०३.२०२३) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकात मोडत असल्याबाबतचे प्रमाणपत्र नियुक्तीपूर्वी संबंधित प्राधिकऱ्यांकडून तपासून घेऊन त्यांच्या नियुक्तीबाबत निर्णय घेण्यात यावा.

**IV. महिला उमेदवारांबाबत सूचना**

अमागास महिलांसाठी आरक्षित पदावर शिफारस करण्यात आलेल्या महिला उमेदवारांची तसेच अन्य वर्गवारीतील महिलांसाठी आरक्षित पदांवर शिफारस करण्यात आलेल्या व नॉनक्रिमिलेअरचे तत्व लागू असलेल्या महिला उमेदवारांची जाहिरातीतील परिच्छेद क्र.५.११ मध्ये (अद्यायावत नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र/आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा म्हणून सक्षम प्राधिकाऱ्याने वितरित केलेले व अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांका वैध असणारे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. **दि.०१.०४.२०२२ ते ३१.०३.२०२३** या कालावधीतील) (पूर्व परीक्षा) नमुद केलेल्या कालावधीतील उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्रे महिला व बाल विकास विभागाच्या शासन निर्णय, क्र. ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दि.२५.०५.२००१ व शासन निर्णय क्र. संकिर्ण -२०१७/प्र.क्र.३०/का-२ दि.१०.०४.२०१७ मधील तरतुदीनुसार विहीत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांकडून त्यांच्या नेमणूकीपूर्वी तपासून घेण्यात यावीत.

प्रस्तुत परीक्षेची जाहिरातीची अंतिम **दि.१४.०२.२०२३ आहे**. त्यामुळे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (NCL) प्रमाणपत्र जाहिरात विज्ञापित झालेल्या वित्तीय वर्षापूर्वीच्या (एप्रिल ते मार्च) वित्तीय वर्षातील म्हणजेच दि.०१.०४.२०२२ ते ३१.०३.२०२३ या वित्तीय वर्षापासून असावे.

६. वयोमर्यादेत सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव पदासाठी विचार शासनाच्या धोरनात्मक निर्णयाच्या अधीन राहून घेण्यात आला आहे, असे स्पष्ट करण्यात येत आहे.

७. प्रस्तुत प्रकरणी शिफारसपात्र ठरलेल्या ४६८ पैकी ४६५ उमेदवारांनी मुख्य परीक्षेच्या वेळी सादर केलेल्या आळखपत्राच्या प्रती यासोबत उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. संबंधित उमेदवारांचा अर्जातील फोटो व प्रत्यक्षात रुजू झालेला उमेदवार तोच आहे का, तसेच त्यांनी परीक्षेच्यावेळी दिलेल्या ओळखपत्रावरुन अर्जातील उमेदवाराचा फोटो व स्वाक्षरी, ओळखपत्रावरील फोटो व स्वाक्षरी त्याच उमेदवाराची आहे का, सादर केलेले ओळखपत्र अधिकृत आहे का, याची नियुक्तीपूर्वी शासन स्तरावरुन सखोल तपासणी करण्यात यावी. तसेच उमेदवारांनी परीक्षेच्यावेळी सादर केलेल्या ओळखपत्राची वैधता संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांकडून तपासून घेण्यात यावी. तद्नंतरच विषयांकित पदावरील उमेदवारांच्या नियुक्त्या करण्यात याव्यात, अशी शासनास विशेषत्वाने सूचना करण्यात येत आहे.

८. प्रस्तुत परीक्षेचा अंतिम निकाल मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण व मा. उच्च न्यायालय येथे दाखल करण्यात आलेल्या विविध मुळ अर्ज/याचिका प्रकरणी होणाऱ्या अंतिम निकालाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे, ही बाब उमेदवारांना त्यांच्या शिफारसपत्राद्वारे विशेषत्वाने निदर्शनास आणण्यात आली आहे.

९. याशिवाय शासनाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पुरस्कृत उमेदवारांसाठी कागदपत्रे पडताळणी विषयक वेळोवेळी निर्देशित केलेल्या बाबी लागू राहतील.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या शिफारसपत्रातील उपरोक्त सुचनांशिवाय महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कर सहायक २०२३ पुर्व परीक्षेच्या जाहिरातीत खालील सुचना नमुद केल्या आहेत.

**१०. प्राविण्यप्राप्त गुणवत्ताधारक खेळाडू उमेदवारांबाबत सूचना**

**अ)** शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दि. ०१.०७.२०१६, तसेच शासन शुद्धीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दि. १८.०८.२०१६, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक संकीर्ण-१७१६/प्र.क्र.१८/क्रियुसे-२, दि. ३०.०६.२०२२ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्यप्राप्त खेळाडू आरक्षासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

प्राविण्यप्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र पूर्व परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे (**दि.१४.०२.२०२३**) किंवा तत्पूर्वी धारण करणे आवश्यक राहील.

**ब)** तसेच त्यासंदर्भातील संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल नियुक्तीपूर्वी शासनाकडे सादर करणे आवश्यक आहे. सदर क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल शासन स्तरावरुन तपासूनच संबंधित उमेदवारांच्या विषयांकीत पदावरील नियुक्तीबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

११. **दिव्यांग उमेदवारांबबात सूचना**

**अ)** दिव्यांग व्यक्तीहक्क अधिनियम, २०१६ च्या आधारे सामान्य प्रशासन विभाग, शा. नि. क्र दिव्यांग-२०१८/प्र.क्र.११४/१६-अ, दि.२९.०५.२०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग आरक्षणासंदर्भातील कार्यवाही करण्यात यावी.

**ब)** सदर शिफारस यादीत नमूद केलेल्या दिव्यांग वर्गवारीतील उमेदवारांची शिफारस सार्वजनिक आरोग्य विभाग, शा. नि. क्र अप्रकि-२०१२/प्र.क्र.२९७/आरोग्य -६, दि.०६.१०.२०१२ नुसार SADM नमुन्यातील तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग, शा.नि. क्र. अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दि.१४.०९.२०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavalambancard.gov.in या संगणकीय प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्रांची तपासणी वैद्यकीय मंडळाकडून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून शासनास शिफारस करण्यात येत आहे.

**क)** सामान्य प्रशासन विभाग, शा. नि. क्र अपंग १००३/प्र.क्र.१२७/२००३/१६-अ, दि. ०६.०५.२००४ मधील बाब क्र. ६ ( अपंग व्यक्तीची निवड झाल्यानंतर त्याची नियुक्ती करण्यापूर्वी शासनाने नियुक्त केलेल्या तज्ञ वैद्यक मंडळाने तो उमेदवार संबंधित पदावर काम करु शकेल असे प्रमाणपत्र दिल्यानंतरच त्याची नियुक्ती करावी) नुसार त्यांच्या नेमणुकीपूर्वी उमेदवारा संबंधित पदावर नियुक्तीसाठी सक्षम आहे किंवा नाही ही बाबत वैद्यकीय मंडळाकडून तपासणी केल्यानंतरच ते नेमणूकीसाठी पात्र ठरतील.

१२. **माजी सैनिक उमेदवारांबाबत सूचना**

माजी सैनिकांसाठी राखीव असलेल्या पदावर शिफारस करण्यात आलेले उमेदवार हे माजी सैनिक या व्याख्येत येतात का, ते सैनिकी सेवेतील विहित अनुभव धारण करतात का, तसेच त्यांच्याकडे माजी सैनिकांसाठी आवश्यक असलेली सर्व प्रमाणपत्रे आहेत का, हे नियुक्तीपूर्वी शासन स्तरावर तपासूनच त्यांच्या नियुक्तीसंदर्भातील कार्यवाही करण्यात यावी.

१३. **अनाथ उमेदवारांबाबत सूचना**

अनाथांसाठी आरक्षित पदावर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांबाबत शा. नि. महिला व बालविकास विभाब क्र. अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-३ दि.२३.०८.२०२१ नुसार सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेल्या विहित नमुन्यातील प्रमाणपत्र नियुक्तीपूर्वी शासन स्तरावर तपासूनच त्यांच्या नियुक्ती संदर्भातील कार्यवाही करण्यात यावी. अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे, त्या प्रवर्गातून करण्यात येईल.

# परिशिष्ट - ब

## कागदपत्रे पडताळणीच्या वेळी उमेदवारांनी सादर करावयाची कागदपत्रे

**कागदपत्रे पडताळणीसमयी खालील प्रमाणपत्राच्या स्वयंसाक्षांकित (Self Attested) प्रती (३ संचामध्ये खालील क्रमानुसार) या कार्यालयास सादर कराव्यात. तसेच सर्व कागदपत्राच्या मूळ प्रती उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणी समयी सोबत बाळगावेत.**

१. इयत्ता १० वी ची गुणपत्रिका आणि प्रमाणपत्र
२. इयत्ता १२ वी ची गुणपत्रिका आणि प्रमाणपत्र
३. पदवी परिक्षेची गुणपत्रिका आणि प्रमाणपत्र
४. जन्मतारखेचा पुरावा (शाळासोडल्याचा दाखला/ एस.एस.सी.उत्तीर्ण प्रमाणपत्र)
५. विहीत नमुन्यातील अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
६. विहित नमुन्यातील जातीचा दाखला (Caste Certificate) (मागासवर्गीय असल्यास)
७. विहित नमुन्यातील जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) (मागासवर्गीय असल्यास)
८. उन्नत व प्रगत गटातमोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र (लागू असल्यास दि.०१.०४.२०२२ ते दि. ३१.०३.२०२३ या वित्तीय वर्षातील)
९. दोन जबाबदार व्यक्तींकडून आपल्या चारित्र्याचे दाखले
१०. महिला उमेदवारांच्या बाबतीत विवाहानंतर नावान बदल झाला असल्याचा दाखला (विवाह प्रबंधक/ राजपत्रिंत अधिकारी यांचा दाखला किंवा राजपत्राची प्रत)
११. एम.एस.सी.आय.टी. (MS-CIT) परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र (रुजु झाल्यानंतर ०२ वर्षाच्या आत सादर करणे आवश्यक.)
१२. मराठी टंकलेखनाचा वेग ३० शब्द प्रति मिनिट आणि इंग्रजी टंकलेखनाचा वेग ४० शब्द प्रति मिनिट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य परीक्षा मंडळाचे प्रमाणपत्र (दिव्यांग, अनाथ आणि माजी सैनिक प्रवर्गातील उमेदवारांना रुजु झाल्यानंतर ०२ वर्षाच्या आत सादर करण्याबाबत सुट तसेच इतर उमेदवारांना कागदपत्रे पडताळणी समयी सादर करणे आवश्यक )
१३. खेळाबाबतचे प्रमाणपत्र व पडताळणी प्रमाणपत्र अहवाल (खेळाडू प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवाराच्या बाबतीत)
१४. शारिरीक दृष्टया अपंग असल्याबाबतचा दाखला (लागू असल्यास)
१५. अनाथ असल्याबाबतचा दाखला (लागू असल्यास)
१६. कर सहायक परीक्षा २०२३- म.लो.आयोगाचे शिफारस पत्र.
१७. परीक्षेच्या वेळी सादर केलेले ओळखपत्र आणि त्या व्यतिरिक्त आणखी एक ओळखपत्र (उदा. आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स)
१८. खुल्या महिला प्रवर्गातून निवड झालेल्या महिला उमेदवारांनी नॉनक्रिमीलेयर प्रमाणपत्र पडताळणीकरीता विभागीय आयुक्त (महसूल) यांच्या समितीसमोर सादर करण्यासाठी, तहसिल कार्यालयातून साक्षांकित करुन देण्यात आलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र पडताळणीविषयी कागदपत्रे सादर करावी.
१९. माजी सैनिक विषयक कागदपत्रे/ प्रमाणपत्रे (माजी सैनिक प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवाराच्या बाबतीत)
२०. नवीन साक्षांकन नमुना (संपूर्ण माहिती भरलेला ३ प्रतीत)

## कर सहायक-२०२३ कागदपत्रे पडताळणीस गैरहजर उमेदवारांची यादी

## परिशिष्ट क

| Sr.no. | MPSC MERIT NO | Candidate Name |
|---|---|---|
| 1 | 3 | KOKATE PRASHANT RAJENDRA |
| 2 | 11 | RAMSHETTY SANGAMESHWAR SHIVKUMAR |
| 3 | 26 | MANE VIJAY UTTAMRAO |
| 4 | 30 | SARODE DALIMBI RAVINDRA |
| 5 | 51 | SHINDE VISHAL SANTOSH |
| 6 | 54 | BHINGARDE ONKAR BABAN |
| 7 | 59 | MALI SHUBHANGI DATTATRAY |
| 8 | 60 | FALKE YASHAWARDHAN BANDU |
| 9 | 66 | HINDOLE VAIBHAV KAMALAKAR |
| 10 | 144 | SHRIKONDAWAR APEKSHA VILAS |
| 11 | 151 | JAGTAP VISHAL DILIP |
| 12 | 159 | DHAYGUDE PRASIDDHA KISAN |
| 13 | 185 | INGOLE AMOL SANTOSH |
| 14 | 219 | GOMLADU RAJENDRA GIRJARAM |
| 15 | 222 | BOTHE MONIKA RAMDAS |
| 16 | 258 | CHIKHALKAR SHUBHAM MAHADEV |
| 17 | 277 | JAMBHULKAR KSHITIJ GYANCHAND |
| 18 | 280 | PATIL DAGDU SAHEBRAO |
| 19 | 291 | PATEL APSANA AHAMADALI |
| 20 | 293 | ANDIL MANDAKINI MAHADEV |
| 21 | 295 | KADAM RESHMA JAYVANT |
| 22 | 300 | KHADE DATTATRAY NANA |
| 23 | 308 | WASU MAYURI HARIDAS |
| 24 | 364 | PALLAVI KAILASRAO INGOLE |
| 25 | 366 | CHAVAN VAIBHAV BHIMRAO |
| 26 | 367 | PATIL SAGAR SAMBHAJI |
| 27 | 373 | BAHEKAR VITTHAL JAGANNATH |
| 28 | 386 | PATIL ASHWINI RAJENDRA |
| 29 | 387 | NIMSE ANIL MANJABAPU |
| 30 | 389 | NIKRAD DATTATRAY CHIMAJI |
| 31 | 391 | TIDKE HANUMANT MADHUKAR |
| 32 | 392 | SAPATE MANOJ MARUTI |
| 33 | 393 | BRAMHANAT VIKRAMSING HIRCHAND |
| 34 | 394 | JADHAV SANDIP MAHADEV |
| 35 | 397 | PATIL NARENDRA SURENDRA |
| 36 | 398 | MORE SHANKAR DIGAMBAR |
| 37 | 399 | GOTE NILESH BANDU |
| 38 | 400 | RAJKOLHE AKASH RAMESH |
| 39 | 401 | GORE SACHIN BIRU |
| 40 | 409 | GHOTEKAR DIPAK SOPAN |
| 41 | 410 | UMESH SHAMRAO BHANDEKAR |
| 42 | 411 | PANSARE RAVINDRA CHANDRABHAN |
| 43 | 413 | VAGARE ANIL SAMPATTI |
| 44 | 414 | KALE ASHOKKUMAR SHAMRAO |
| 45 | 415 | JANGALE PARMESHWAR KACHARU |

| | | |
|---|---|---|
| 46 | 416 | PARDESHI SURENDRASING SUBHASHASING |
| 47 | 417 | KOTKAR SANDEEP BHIMRAO |
| 48 | 422 | PATIL SHANKAR ONKAR |
| 49 | 425 | PATIL PRAMODSING DEOSING |
| 50 | 427 | SONAWANE DIPAK SAHEBARAO |
| 51 | 429 | GALANDE ATUL VITHAL |
| 52 | 433 | MAHESH SHIVAJI NARVADE |
| 53 | 435 | TIKALE NARENDRA ANANDRAO |
| 54 | 436 | DALVI BABASAHEB POPAT |
| 55 | 437 | ATUL ACHYUT THUBE |
| 56 | 440 | DURGUDE MADHUKAR BALASAHEB |
| 57 | 441 | PAWAR PRAMOD JIBHAU |
| 58 | 442 | PATIL SANDEEP BHAGAVAN |
| 59 | 443 | THANGE DEVRAM BHASKAR |
| 60 | 444 | GUND DEVIDAS DATTU |
| 61 | 445 | KAMBLE MADHAV MALUJI |
| 62 | 446 | KADLAG DIPAK BALASAHEB |
| 63 | 448 | JADHAV AKSHAY SUNIL |
| 64 | 453 | GIRI AJAY PRAKASH |
| 65 | 454 | SHRINATH RAVINDRA TUKARAM |
| 66 | 456 | SATPUTE RAVINDRA SALIKRAM |
| 67 | 457 | SURESH MURLIDHAR WAGHMARE |
| 68 | 460 | HARLE SIDDHARTH UTTAMRAO |
| 69 | 461 | MANE SATISH JAGANNATH |
| 70 | 462 | PRAKASHKAR ATUL HARI |
| 71 | 464 | SOLANKE NARAYAN RAMA |